
# विद्यापीठ अधिसभेत ३९ ठराव मागे

कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा



शिवाजी विद्यापीठाच्या बुधवारी रात्री उशिरापर्यंत चाललेल्या अधिसभेच्या बैठकीत ४७ ठराव मांडण्यात आले. त्यापैकी ८ ठराव मान्य करण्यात आले असून, ३९ ठराव मागे घेण्यात आले. कुलगुरुपदी निवड झाल्यानंतर डॉ. डी. टी. शिर्के यांची पहिलीच सभा वादळी ठरली.

श्रीनिवास गायकवाड यांनी पाठविलेल्या सूचना नाकारल्याबद्दल सदस्यांना पत्रव्यवहार करून कळवावे, अशी मागणी केली. प्रा. शंकरराव कुलकर्णी यांनी प्रशासनाने सोयीस्कर अर्थ काढू नये, यासंदर्भात कार्यशाळा घेण्याची सूचना केली. भय्या माने यांनी अहवालात व्याकरणाच्या छोट्या-छोट्या चुका होऊ नये हे गांभीर्याने पाहावे, अशी मागणी केली. डॉ. एस. डी. डेळेकर यांनी परीक्षा विभागातील करार प्रकरणाचा मुद्दा मांडला. यावर कुलगुरूंनी प्रशासकीय स्तरावरून दुरुस्तीसंदर्भात माहिती दिली जाईल, असे उत्तर दिले.

प्रा. अशोककुमार पाटील यांनी विद्यापीठ परिनियमानुसार प्रश्न पाठविले आहेत. प्रश्न नाकारणे अन्यायकारक असल्याचे सांगितले. यावर कुलगुरूंनी या विषयावरील चर्चा नको, असे सांगितले. विद्यापीठ प्रश्नाशी संबंधित व सुसंगत प्रश्न असूनदेखील चुकीच्या पद्धतीने नाकारले म्हणून सदस्यांनी स्थगन प्रस्ताव सादर केला. तो नाकारल्याने प्रा. डॉ. इला जोगी, प्रा. डॉ. नीलकंठ खंदारे, प्रा. डॉ. मनोज गुजर, प्रा. डॉ.अलका निकम यांनी सभात्याग केला. दरम्यान, अधिसभेत २०१९-२०२० चे वार्षिक लेखे, ताळेबंदपत्रक व लेखापरीक्षण अहवाल मंजूर करण्यात आले. २०१९-२० चा विद्यार्थी विकास मंडळाचा अहवाल, २०१९-२० मधील क्रीडा व शारीरिक शिक्षण मंडळाचा अहवाल, विद्यार्थी तक्रार निवारण कक्षाचा अहवाल मान्य करण्यात आले.

## प्राध्यापकांचे उद्यापासून धरणे आंदोलन

चंदगड येथील एका शिक्षण संस्थेत प्रा. नागेंद्र जाधव हे २०१२ पासून अधिव्याख्याता आहेत. सेवेस मान्यता मिळावी म्हणून त्यांनी उच्च न्यायालयात याचिका दाखल केली. न्यायालयाने सेवा नियमित करण्याचा आदेश दिला. संस्थाचालकांकडून याची दखल न घेतल्याने ते १ जानेवारीपासून विद्यापीठ मुख्य इमारतीसमोर बेमुदत धरणे आंदोलन करणार आहेत, असे प्रा. मधुकर पाटील, अमरसिंह रजपूत यांनी सांगितले.

# विद्यापीठाची बदनामी, विद्यार्थ्यांचे नुकसान करणाऱ्यांवर कारवाई करा

## अधिसभेत आग्रही मागणी : प्रश्न मांडण्याबाबत सदस्यांना प्रशिक्षणाची गरज

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठांतील विविध अधिविभागांमधील राजकारण, वादामुळे विद्यार्थ्यांचे नुकसान होत असून ते बंद करावे. विद्यापीठाची प्रतिमेला बाधा पोहोचविणाऱ्या, बदनामी करणाऱ्या विद्यार्थी संघटनांना बळ देणे काही अधिकाऱ्यांनी थांबवावे. विद्यार्थ्यांचे नुकसान, विद्यापीठाचा बदनामी करणाऱ्यांवर प्रशासनाने कारवाई करावी, अशी आग्रही मागणी अधिसभा सदस्यांनी बुधवारी केली.

तांत्रिक आणि व्याकरणातील चुकांमुळे विविध ठराव, प्रश्न अधिसभेत स्वीकारण्यात आले नाहीत. जे प्रश्न उपस्थित झाले. त्याची प्रशासनाकडून मिळालेली उत्तरे आणि त्यावर सदस्यांनी केलेली चर्चा यामध्ये विस्कळीतपणा या सभेमध्ये स्पष्टपणे जाणविला. त्यामध्ये अनेक महत्त्वाचे प्रश्नांवर चर्चा झाली नाही. त्यावर अधिसभेत ठराव, प्रश्न मांडण्याबाबत सदस्यांना प्रशिक्षण देण्याची गरज असल्याचे मत अधिसभा सदस्य डॉ. प्रताप पाटील यांनी मांडले.

### कोण, काय म्हणाले?

- भैय्या माने : प्रशासनाने निष्काळजीपणा सोडावा. प्रश्न मांडण्यामागील सदस्यांची भावना समजून घ्यावी.
- अमरसिंह रजपूत : अधिविभागांतील राजकारण, वाद बंद होऊन विद्यार्थ्यांचे कल्याण व्हावे.
- डॉ. प्रताप पाटील : विद्यार्थ्यांचे नुकसान, विद्यापीठाची बदनामी करणाऱ्यांवर प्रशासनाने कारवाई करावी.
- निलंकठ खंदारे : प्रशासनाने आमचे प्रश्न नाकारले; त्याबाबत तक्रार करणार.

### या सभेतील वादाचे मुद्दे

- ठरावातील व्याकरणाच्या चुका, कार्यसूचीमधील त्रुटी
- प्रशासनाकडून चुकीची माहिती, प्रश्न नाकारण्याचा मुद्दा
- हलकर्णी येथील एका मागासवर्गीय प्राध्यापकावर प्रशासनाने अन्याय केल्याचा प्रश्न
- अधिसभा सदस्यांच्या सूचनांचा अंतर्भाव नसणे. त्याचे कारण त्यांना कळविल्याचा मुद्दा

# डॉ. आप्पासाहेब पवार यांना अभिवादन

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाचे प्रथम कुलगुरू डॉ. आप्पासाहेब पवार यांच्या ३९ व्या पुण्यतिथीनिमित्त विद्यापीठात अभिवादन करून आदरांजली वाहण्यात आली.

विद्यापीठाच्या मुख्य प्रशासकीय इमारतीत डॉ. आप्पासाहेब पवार यांच्या प्रतिमेस कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के व प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांच्या हस्ते पुष्पहार वाहून अभिवादन करण्यात आले. त्यानंतर मान्यवरांच्या हस्ते अतिथीगृह परिसरातील व डॉ. आप्पासाहेब पवार विद्यार्थी भवन येथील डॉ. पवार यांचा अर्धपुतळा येथे अभिवादन करण्यात आले. यावेळी कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक जी. आर. पळसे, वित्त व लेखाधिकारी व्ही. टी. पाटील, विद्यार्थी विकास मंडळाचे संचालक डॉ. आर. व्ही. गुरव, प्रा. किसनराव कुराडे, प्रा. टी. के. सरगर आदी उपस्थित होते.